☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / /पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 05/09/2025

# श्री गणेशोत्सव विसर्जन अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नांदेड पोलीसांचा तगडा बंदोबस्त...

श्री गणेशोत्सव बंदोबस्त अनुषंगाने जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी **मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधिक्षक, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत ठिक ठिकाणी शांतता कमिटीच्या बैठका घेवून लोकांना तसेच प्रत्येक गणेश मंडळांना शांतता राखण्याचे आवाहन केले आहे.

श्री गणेशोत्सव विसर्जन बंदोबस्त शांततेत पार पाडावा यासाठी नांदेड जिल्हयातील महत्वाचे सर्व ठिकाणी योग्य तो पोलीस बंदोबस्त लावण्यात आला असुन कोणताही अनुचित प्रकार होणार नाही याकरीता संयुक्त सेक्टर पेट्रोलींगचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच विसर्जन बंदोबस्ता दरम्यान महत्वाचे सर्व ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले आहेत व श्रीगणेश विसर्जन शांततेत पार पडावे याची सर्वोतोपरी काळजी घेण्यात आली आहे. श्री गणेश विसर्जन बंदोबस्त कामी नांदेड शहर व ग्रामीण भागातील बंदोबस्ता करीता पुढील प्रमाणे अधिकारी व अंमलदार तसेच होमगार्ड नेमण्यात आले आहेत.

1) मा. पोलीस अधीक्षक नांदेड, 2) अपर पोलीस अधिक्षक–02 3) उप विभागीय पोलीस अधिकारी –08 4)पोलीस निरीक्षक–39 5) सपोनि/पोउपनि–206 6) पोलीस अंमलदार–3195 7) आरसीपी प्लाटून–05 8) एसआरपीएफ–01 कंम्पनी 9) क्युआरटी–48 पोलीस अंमलदार 10)पुरूष होमगार्ड–1300 11) महिला होमगार्ड–275

तसेच बाहेरून गणेशोत्सवा निमित्त मागविण्यात आलेला बंदोबस्त पुढील प्रमाणे 1)पोलीस उप अधीक्षक–01 2)पोलीस निरीक्षक–08 3)एसआरपीएफ–01 कंम्पनी 4)महामार्ग पोलीस 50 अंमलदार 5) प्रशिक्षणार्थी पोउपनि–20 अधिकारी, असा बंदोबस्त लावण्यात आला आहे.

जिल्हयामध्ये स्थानिक पोलीस, आरसीपी, एसआरपी व बाहेरून मागविण्यात आलेला बंदोबस्त करीता आलेले अधिकारी अंमलदार यांचेकडून पथसंचलन (रूटमार्च) काढण्यात आला, दंगा काबू योजना सराव घेण्यात आला तसेच जिल्हयातील शांतता अबाधित राखण्यासाठी एकत्रिक संयुक्तरित्या सर्व पोस्टे स्तरावर सुनियोजित पध्दतीने इतर सुरक्षा विषयक उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत.

श्री गणेशोत्सव विसर्जन बंदोबस्त अनुषंगाने जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी **मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधिक्षक, नांदेड** यांनी भयमुक्त व डि.जे.मुक्त गणेशोत्सव साजरा करणे बाबत नांदेड जिल्हयातील सर्व नागरीकांना आवाहन केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड